**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.4 No.15** **Mar-Apr 2023**

# माहिती तंत्रज्ञानाच्या युगात शैक्षणिक ग्रंथालयाची बदलती भूमिका

**प्रा॰ असित वि. शेगावकर**
ग्रंथालय व माहितीशास्त्र
सिदधार्थ कॉलेज मिटमिटा,
औरंगाबाद.
**Corresponding Author- Ms Snehal Vijaykumar Tade**

**प्रस्तावना :-**

ग्रंथालयातील हस्तलिखित दुर्मिळ ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, अमुद्रित साहित्य संग्रह यांचे जतन करणे अत्यंत महत्वाचा भाग झाला आहे. माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानात आज माहितीचे उत्पादन मोठया प्रमाणात होत आहे. आज माहिती ही विविध स्वरूपात व माध्यमात उपलब्ध आहे. आजच्या आधुनिक युगात माहिती व तंत्रज्ञानाच्या विकासामुळे माहितीचा विकास फार मोठ्या प्रमाणात होत आहे. ग्रंथालयात असणाऱ्या ज्ञान साहित्याचा सांभाळ करणे व ग्रंथ सुरक्षेला विशेष असे स्थान आहे.त्यामुळेच माहिती तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेमूळे ग्रंथालयात होणारी जतन व सुरक्षेसाठी इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानाचा वापर करता येतो. यामुळेच 21 वे शतक हे ज्ञान युग आहे. या ज्ञान युगामुळे माहिती वर आधारित ज्ञान साहित्याला अधिक महत्व येत आहे.

**व्याख्या :- ऐल्विन टॉफलर**

"माहितीची क्रांति ही कृषि व औद्योगिक क्रांतिपेक्षा मानवीय जीवनाला कलाटनी देणारी ठरली आहे. नव्या युगात माहिती समाजापर्यंत कशा पद्धतीने पहुचेल यावर त्याची उपयुक्तता व यश अवलंबून आहे. त्यामुळे माहिती तंत्रज्ञानाच्या ग्रंथालयात उपयोग करणे गरजेचे आहे."

ग्रंथ वाचक व ग्रंथपाल या घटकानी मिळून ग्रंथालयाची संकल्पना पूर्ण होत असते.परंतु माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतिमुळे, विकासामुळे आजची प्रगत व आधुनिक ग्रंथालय हे संगनिकृत ग्रंथालये, इलेक्ट्रॉनिक ग्रंथालये, डिजिटल ग्रंथालये तयार झाले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे ग्रंथालयाच्या विकासात व अन्य घटकांमध्ये फार मोठ्या प्रमाणात बदल होत गेलेला आहे. ग्रंथालय संगणक संप्रेषण, वर्ल्ड वाइड वेब(www) या साधनाने ग्रंथालय व विविध क्षेत्रात अमूलाग्र बदल घडून आलेला आपणास दिसून येतो.

**व्याख्या टेरेन्स स्मिथ –**

"शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेले व डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून त्याची व्यवस्थितमांडणी करून करुन ते वापरण्यासाठी विविध पद्धतीने विविध अंगाने वापरण्याजोग्या मार्गासहित उपलब्ध डिजिटल साहित्य संग्रह होय."

आज अनेक नवीन माध्यमे निर्माण झाली आहे या माध्यमातून नव-नवीन ज्ञान अवगत होत आहे.या माहितीच उपयोग लहान बालकांपासून ते वृध्दापर्यंत सर्वांना होत आहे. जगातील काण्या-कोपऱ्यात पर्यंत ची माहिती व सर्व बाबी आपणास नवीन तंत्रज्ञानामुळे अगदी आपल्याजवळ आल्या सारखी वाटत आहे. नवीन ज्ञान, नवीन माहिती खालील मध्यमाद्वारे प्राप्त करुन घेता येते.

1. इंटरनेट सेवा
2. न्यूज़पेपर क्लिपिंग सेवा
3. विशेष ग्रंथसंग्रहाचे डिजिटाइजेशन
4. इलेक्ट्रॉनिक संदर्भ सेवा
5. इंटरलाइब्रेरी लोन सेवा
6. e-publishing
7. इलेक्ट्रॉनिक डॉक्यूमेंट्री
8. डिस्कवरी सर्विस
9. इलेक्ट्रॉनिक थिसिस
10. ओपॅक साइंस एंड रिसर्च स्टेशन ऑफ 1
11. वर्ड प्रोसेसर पॉकेट केलकुलेटर
12. सीडी रोम
13. ऑनलाइन सर्च व नेटवर्क

शैक्षणिक ग्रंथालयामध्ये शालेय ग्रंथालय, महाविद्यालयीन ग्रंथालय, विद्यापीठ ग्रंथालय या तिन्ही ग्रंथालयामध्ये आपणास शैक्षणिक साहित्य किंवा ज्ञान साहित्य हे वेगवेगळ्या प्रकारचे असतात.म्हणजेच विदयार्थ्यांच्या बौद्धिकतेनुसार ज्ञान साहित्याचा साठा ग्रंथालयामध्ये वाचकांना उपलब्ध करून देत असतात. शैक्षणिक ग्रंथालयात वाचन साहित्य हे त्यांच्या अभ्यासक्रमासाठी लागणारे ज्ञान साहित्य दिले जाते. पूर्वी शालेय ग्रंथालय हे विकसित नव्हते किंवा विद्यार्थी ग्रंथालयात येत नव्हता .याचे कारण त्यांना पुस्तकाशिवाय इतर माहिती मिळत नव्हती परंतु आज माहिती

तंत्रज्ञानाच्या जोरावर शाळेत संगणक आल्यामुळे जगातील नव-नवीन माहिति मिळणे अत्यंत सोपे झाले आहे.

विदयार्थ्यांचा ग्रंथालयाकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलत चालेला आहे. त्यांना आता ग्रंथालय हे जीवनाचा एक भाग झालेला आहे. विदयार्थ्यांची मानसिकता बदललेली आहे. नव-नवीन आव्हाने स्वीकारन्यास तयार झाली आहे. भौगोलिक ,ऐतिहासिक, विज्ञान इत्यादि विविध क्षेत्रात ही विद्यार्थी प्रगति करत आहे. त्यांच्या मध्ये काहीतरी नवीन करण्याची जिद निर्माण झाली आहे.याचे कारण माहिति तंत्रज्ञान विकसित झाल्यामुळे त्यांच्या विकासाला चालना मिळाली.

महाविद्यालयीन ग्रंथालय विदयार्थ्यांना शैक्षणिक साहित्याबरोबरच ग्रंथालयात उपलब्ध असलेली नव-नवीन ज्ञान साहित्य मिळत आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे संगणक हाताळणी, संदर्भ सेवा, जगातील नव-नवीन शोध, नव-नवीन माहिती, ग्रंथ, वाचन साहित्य, जनरल आशा नव-नवीन माहिती मिळत आहे. यामुळे विचाराचा दृष्टिकोण बदलत आहे. नवीन संशोधांनाच्या दृष्टीने वाटचाल करीत आहे. ग्रंथालयातील ग्रंथपालाना आजचे नवीन युग तंत्रज्ञानाचे युग हे एक आव्हान आहे.आणि हे नवीन आव्हान त्यांनी स्वीकारले आहे. म्हणजेच नवीन तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथपाल हा अतिशय सक्षम कार्यक्षम व तत्पर झाला आहे. त्याची बौद्धिक क्षमता नवीन तंत्रज्ञानाने विकसित झाली आहे.

आजचा ग्रंथपाल हा विद्यार्थ्यांच्या विचार सरणीपेक्षा ही अधिक कार्यक्षम आहे. विदयार्थ्यांनी ग्रंथपालाला विचारलेल्या विविध प्रश्नांची तत्काल उकल करने गरजेचे असते. म्हणून ग्रंथपाल हा सर्वांगीण विकासात्मक असतो. ग्रंथालयात येणारा प्रत्येक वाचक वर्ग त्यांना दिली जाणारी माहिती ही अचूक असते त्यातूनच वाचकांचे समाधान होत असते. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालयात विशेष करुण महाविद्यालयात विद्यार्थी घडत असतो. दिशा स्वत:ठरवीत असतो. हा दृष्टिकोण लक्षात घेऊन ग्रंथालयात संगणक प्रणाली, संदर्भ सेवा, नवीन घड़ामोड़ीवर आधारित पुस्तके, जनरल्स अद्यावत माहिती. नवीन तंत्रज्ञानावर आधारित ज्ञान कमी वेळात अधिकाधिक मिळणारी माहिती व इतर ज्ञान साहित्य. ग्रंथालयात नवीन साहित्याच्या माध्यमातून ग्रंथालयाचा विकास होत आहे. विदयार्थ्यांना माहिती मिळत आहे. त्यांना नवीन काही तरी करण्याची जिद्द निर्माण झाली आहे. विदयार्थ्यांचा जगाला पाहण्याचा का दृष्टिकोण बदलत आहे.

शैक्षणिक ग्रंथालयामध्ये सर्वात मोठा विकासाचा टप्पा म्हणजे विद्यापीठ ग्रंथालय आहे. या ग्रंथालयात येणारा वाचक वर्ग बौद्धिक विकासाच्या दृष्टीने अत्यंत कार्यक्षम असतो. वाचकाला पाहिजे असलेली माहिती ही विचाराच्या पलीकडे गेलेली असते. अशा वाचकांना माहिती तत्परतेने लवकरात- लवकर देने गरजेचे आहे. त्यामुळे नवीन तंत्रज्ञान विकसित झाल्यामुळे वाचकाला मिळणारी माहितीही अचूक मिळत असते. विद्यापीठातील वाचक वर्ग हा संशोधक असतो. त्याला हवी असनारी माहिती ही अचूक व नाविन्यपूर्ण अध्यावत लागत असते त्यातूनच तो नवीन संशोधक वृत्तिने जगासमोर काही तरी करून दाखवण्याची धडपड करत असतो .

आज नवीन तंत्रज्ञानामुळे हे शक्य झाले आहे. तंत्रज्ञानाच्या युगात माहितीचा विकास झालेला आहे. माहितीमुळे विविध साधनांची माहिती मिळाली आहे. माहिती प्रसारणाची जलद साधने उपलब्ध झालेली आहे. वाचकाना कमी वेळात माहिती मिळत आहे. आज माहिती उपलब्धतेची अनेक साधने ग्रंथालयात उपलब्ध आहेत. ग्रंथ, नियतकालिके, सीडी रोम, इंटरनेट, वेबसाइट, रिपोर्टर, डाटाबेस थिसिस , संदर्भ ग्रंथ प्रकाशने इत्यादि साधने सहजतेने आज ग्रंथालयात उपलब्ध आहेत.

शैक्षणिक ग्रंथालयात मुद्रित वाचन साहित्य बरोबरच माहिती तंत्रज्ञान विकासा मळे ग्रंथालयात विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाचा दृष्टिकोण लक्षात घेऊन वाचक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी काही वाचक साहित्याचा वापर करने व त्या साहित्याची माहिती देने गरजेचे आहे.

1. ई -साक्षरता
2. ई-इंटरनेट
3. ई-नियतकालिके
4. ई- वृत्तपत्र
5. ई-शासन
6. ई-ग्रंथ
7. ई-डाटाबेस
8. ई- नेटवर्क
9. ई- अध्ययन
10. ई- थिसीसी

इत्यादि अशा विविध वाचन साहित्य आपल्याला माहिती तंत्रज्ञानामुळे शक्य झाले आहे. यातूनच नवीन-नवीन माहिती मिळत आहे.

**सारांश :-**

माहिती तंत्रज्ञानामुळे ग्रंथालयातील कामाला सुसूत्रता आणि गति मिळाली आहे. अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक्स माध्यमे अस्तित्वात आली आहे. त्यामुळे केवळ ग्रंथावर अवलंबून न राहता संगणकीय तंत्राचा उपयोग करून वाचकांना उपयुक्त व अद्यावत माहिती, सेवा पुरवण्यात येत आहे. ग्रंथपालानी वाचक वर्ग व नवीन तंत्रज्ञान या मध्ये सांगड घालून दिलेली आहे. त्यामुळे वाचक वर्ग अगदी प्रगत झाला आहे. नव-नवीन प्रगत साधने विकसित होत असताना वाचकांची ज्ञानाची भुखपण त्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे ग्रंथालायचा विकास हा झपाट्याने वाढत चाललेला आहे.

शैक्षणिक ग्रंथालय ही आज विविध अंगाने प्रगतिशील झालेली आहे. वाचक वर्ग हा ग्रंथालयाचा एक भाग आपल्या जीवनाशी जोड़ला गेलेला आहे. जगातील नव-नवीन माहिती ताज्या घड़ामोड़ी ही माहिती लवकरात

लवकर देन्याचे काम आज माहिती तंत्रज्ञान या युगामुळे शक्य झाले आहे.

**संदर्भ :-**

1) डॉ द. ना फडके - ग्रंथालय संगनिकरण आणि आधुनिकीकरण - यूनिवर्सल प्रकाशन- पुणे 2010

2) श.गो भट्ट - इलेक्ट्रॉनिक माहिती साधने – पिंपळा पूरे बुक डिसटीब्यूशन - नागपुर 2008